मंगळवार दि.०७ मे २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २५०
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# प्रत्येकाच्या आयुष्यात साथीला एक ज्ञानेश असावाच...!

जीवलग मित्र असेच असतात, पाखरासारखे कुठून तरी उडत उडत येतात आणि मैत्रीच्या फांदीवर येऊन स्थिरावतात. सुख दुःखाची गाणी विश्वासाने आपल्या जवळ गुणगुणत असतात आणि एक एक दिवस मैत्रीच्या धाग्याची गुंफण गुंफत असतात असंच हे ज्ञानेश नावाचं पाखरू उडत उडत मैत्रीच्या फांदीवर येऊन स्थिरावल आणि दैनिक लोकनेताच्या महायज्ञाचे शिल्पकार बनून बसलं आणि मैत्रीच्या दुनियेतील विश्वासच गाणं गुणगुणू लागलं. ते गाणं इतकं सुंदर होत की आमच्या मैत्रीचे झाड जसं वसंत ऋतूमध्ये बहराव तसं जीवन जगत असताना आपल्याला अनेक माणसं भेटतात काही क्षणापुरती भेटतात तर काही आयुष्यभराठी मनात घर करुन जातात. लोक म्हणतात ना देव कधी दिसत नाही पण आपल्याकडे कोणत्या रुपात येतो हे ही कळत नाही, असंच माझ्या आयुष्यात प्रत्येक अडचणीत साथ देणारा हा मित्र कधी मोठ्या भावासारखी डोक्यावर मायेची सावली धरून बसला समजलंच नाही. कोणत्याही क्षणी कोणतीही अडचण आली तरी घाबरु नका जे काय होईल ते बघून घेऊ असे सांगणारे माझे मोठे बंधू ज्ञानेश्वर बुधवंत प्रत्येक प्रॉब्लेमचं सोल्युशन मला इथेच मिळतं. आज आमच्या मैत्रीला जवळपास चार वर्षे पूर्ण होऊन गेले पण नात्यातील विश्वासही तेवढाच व्याजाच्या पैशासारखा वाढतच गेला. आमचे बंधू म्हणजे कोणावरही सहज विश्वास न ठेवणारा



**ज्ञानेश्वर मुंढे**
**संपादक दैनिक लोकनेता**
**मो.७४९९६१५९३३**



माणूस, पण लोकांचा अगदी सहज विश्वास जिंकतो ही कला परमेश्वराने त्यांना दिलेली एक अनमोल देणगीच आहे. आपल्या उत्कृष्ट लेखणी बातमी करत असताना शब्दांची चौफेर बॅटिंग करणारे युवा पत्रकार म्हणून सिंदखेडराजा आणि बुलढाणा जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्राच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. बंधूंच्या बातमीची शैली म्हणजे चुकला तिथे ठोकला बंदुकीच्या गोळ्या सारखे शब्दांच्या गोळ्या आणि चुकलेल्यांना न सहन होणारे घाव बंधूंच्या लेखणीतून दिसून येतात. कोणत्याही माणसाचा कोठूनही कॉल आला आणि कामाचा प्रचंड व्याप कितीही असला तरी मदतीचा प्रामाणिक प्रयत्न कसा असतो हे बंधूंकडून शिकण्यासारखं आहे, आमची मैत्री सोशल मिडीयातुन झाली, एकाच वायाचे एकाच विचाराचे दोन तरुण एकमेकांना भेटले आणि सुरू झाले एक नवे पर्व म्हणजेच जनसामान्य माणसांचे हक्काचे व्यासपीठ दैनिक लोकनेता तसेच विश्व मल्टिपर्पज फाऊंडेशन पण या सर्व लढाईत तलवार आणि ढाल बंधू असल्यामुळे हे साम्राज्य जिंकता आले. लवकर पहील्या टप्प्यातील तिसरा विडा एका मोठ्या संस्थेचा उचललेला आहे आणि तोही बंधूंच्या साथीने यशस्वीरीत्या जनसेवेत सुरू होईल यात कुठलीही शंका नाही.

मी आपल्या मध्ये एक उत्कृष्ट व्यवस्थापक संपादक, तसेच लेखक संयमी माणूस पाहीला आहे, मग तो दैनिक लोकनेता परिवार असेल किंवा मग कुटुंब, आपली निर्णय क्षमता, सर्वसमावेशक भूमिका आणि प्रत्येक सहकाऱ्याला आपलंसं करून घेण्याची कला अप्रतिमच आहे. एवढेच नव्हे तर प्रेमाची व्याख्या स्पष्ट करणार आहेत प्रेमी, मैत्रीचा उत्कृष्ट वाहक हे आमच्यासारख्यांना जणू अनुग्रहच; म्हणूनच म्हणतो प्रत्येकाच्या आयुष्यात साथीला एक ज्ञानेश असावाच....! आज हा लेखणीचा बादशहा एका वर्षाने थोरला होतोय, आजच्या या पवित्र दिनी एवढेच म्हणाल की कायम असू सहप्रवासी या आनंद यात्रेचे या अभिवचनासह वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा आपण शतायुषी व्हावे व निरोगी जीवन जगावे एवढीच भाऊ बाबा चरणी प्रार्थना करतो....!



संपादकीय

# शोध बिस्किटाचा

आपण नियमित खात असलेले बिस्टिक नक्की आले कोठून, त्याचा शोध कोणी लावला, या पदार्थाचा प्रवास कसा झाला असेल, असे अनेक प्रश्न पडायचे, म्हणून त्याच्या उत्तरांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

रोज सकाळी किंवा दुपारी चहाच्या कपात बिस्किट बुडवताना नेहमी प्रश्न पडतो, की हा अफलातून प्रकार कोणी बनवला, कोणी शोधला? या बिस्किटाचा कुठे शोध लागाला? मुळात बिस्किटाला बिस्किट हे नाव कसे मिळाले?बिस्किट हे ब्रिटिशांनी दिलेले नाव. ते 'बिस क्यू' या फ्रेंच शब्दावरून आले. त्याचे मूळ 'पॅनिस बिस्कोटस' या लॅटिन पदार्थात आहे. याचा अर्थ दोनदा भाजलेला ब्रेड असा होतो. रोमन लोकांकडेही बिस्किटे होती; पण ती आपण खारी म्हणतो किंवा इंग्रजीत 'रस्क' म्हणतात तशी होती. रस्क आजही मूळ स्वरूपात आहेत. त्याचीच बहीण खारी. तीदेखील सुद्धा वेगवेगळ्या प्रकारात सध्याही उपलब्ध आहे. भारतातील बिस्किटाचा प्रवास मुगल, पर्शियनयांच्या भारतातील प्रवासातून सुरू झाला आणि मग डच, फ्रेंच यांच्याबरोबर चालू राहिला. तो ब्रिटिश साम्राज्याबरोबर शिखरावर पोहोचला.दिल्लीतल्या चांदनी चौकातील गजबजलेल्या सीताराम बाजारातील एका पडक्या, जीर्ण दुकानात रोज संध्याकाळी खारी बनतात, त्याचे गरम ट्रे बाहेर यायचा अवकाश, त्यावर आजूबाजूचे असंख्य लोक तुटून पडतात. दुपारच्या चहात हे टोस्ट बुडवून खाल्याशिवाय कोणालाच चहा गोड लागत नाही. अर्थात, हे मी ऐकले आहे. पहिले किंवा चव घेतलेली नाही. माझ्या 'बकेट लिस्ट'मध्ये ही खारी नक्कीच आहे. येथेच सकाळी लोक 'फयान' म्हणजे फुगीर पापुद्र्याचा केकसमान पदार्थ खायला, दुपारी खोबऱ्याची बिस्किटे खायला येतात, असे ऐकतो. शेजारच्या जामा मशिदीजवळच्या चावरी बाजारमध्ये अशीच एक नानकटाईची गादी गर्दी खेचते, असे म्हणतात. ही नानकटाई गरमागरम मिळते म्हणे!हे झाले दिल्लीतले. देशातील इतर ठिकाणी वेगळी परिस्थिती नाही. पंजाबमधील तुपाने बरबटलेल्या पिठाच्या कुकीज, मुंबईतील प्रसिद्ध खारी, तशी ही खारी सगळीकडेच प्रसिद्ध आहे, विशेष करून चहाच्या कोपऱ्या कोपऱ्यावरील टपरीत आणि हो बरणीतले क्रीम रोल विसरायला नको! पुण्याला कयानी बेकरीच्या पुढे पुणेकरांचीच नव्हे, तर इतर गावातील लोकांचीही रांग लागते ते प्रसिद्ध श्रुजबेरी बिस्किट किंवा हैद्राबादच्या कराची बेकारीची टुटीफ्रुटी युक्त थोडीशी पिठूळ बिस्किटे. प्रत्येक भारतीय गावात कुठली तरी बेकरी आपल्या कुठल्या तरी बिस्किटासाठी प्रसिद्ध आहे.सतराव्या शतकातील बिस्किटे खारीसारखी होती. दोनदा भाजून फुगवलेली; पण त्यात गोडपणा नव्हता. ब्रिटन, फ्रान्स, युरोपमधील बिस्किटेही अशीच. त्या काळी साखर फारशी बनत नव्हती; त्यामुळे महागही होती. ब्रिटनमध्ये ती पूर्वेकडून यायची, म्हणून खूप महाग. फक्त श्रीमंताना परवडायची. सतराव्या शतकातच चहा, कॉफी व कोकोसारखी पेये प्रसिद्ध होऊ लागली. या पेयांबरोबर तोंडात टाकायला चांगली, म्हणून बिस्किटांचा वापर जास्त सुरू झाला. गंमत म्हणजे, या शतकात जेवल्यानंतरची 'स्वीट डिश' म्हणूनही बिस्किटे खाल्ली जाऊ लागली होती. फॅक्टरीत बनलेली बिस्किटे हा प्रकार तसा नवाच. त्या आधी वेगवेगळ्या ब्रेड, पाव हाताने बनवण्याऱ्या दुकानांतील, कोळशाच्या भट्टीत भाजलेली थोडीशी ओबडधोबड बिस्किटेच जास्त.साधारण साठच्या दशकात पुण्यात घरगुती बिस्किटे पुष्कळ घरात बनवली जायची. त्यासाठी मदत करायची त्या काळची पुण्यातील प्रसिद्ध 'हिंदुस्तान बेकरी'. सकाळी एका मोठ्या डब्यात घरातील गृहिणी कणिक, मैदा, बेकिंग पावडर, साखर यांचे 'हिंदुस्तान बेकारी'ने दिलेल्या कृतीप्रमाणे चांगले मिश्रण करून, तो पिठाचा गोळा जवळच्या 'हिंदुस्तान बेकरी'त पोहोचवायच्या. आमच्यासारखी, त्या काळी लहान असलेली मुले तो डबा बेकरीत नेऊन टाकत.

# जीएसटीची भरारी




सन २०१७ मध्ये देशात लागू झालेल्या वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) संकलनाने विक्रमी भरारी घेतली आहे. ही भरारी म्हणजे जीएसटीविरोधकांसाठी एक धडाच आहे.त्याचसोबत, या कायद्यात अनेक सुधारणा होणेही गरजेचे आहे, हे या निमित्ताने लक्षात घ्यायला हवे.आपल्या देशातील सेवावस्तू कराच्या (जीएसटी) सद्यस्थितीच्या वर्णनासाठी वरील शब्द अगदी चपखल ठरतील. जीएसटीच्या माध्यमातून एप्रिल २०२४ या एकाच महिन्यात २.१ लाख कोटी रुपये इतके विक्रमी संकलन झाले. एवढेच नव्हे तर त्यातील राज्यसरकारांचा वाटा देखील त्वरित त्यांना देऊन झाला, हे या डिजिटल पद्धतीने आकारल्या जाणाऱ्या करप्रणालीचे एक मोठे फलित आहे. तसे बघायला गेले तर २ लाख कोटी रुपये संकलनाचा टप्पा एप्रिलमध्ये पार होईल, असे भाकीत महिन्याच्या सुरुवातीलाच सरकारी सूत्रांनी केले होतं. त्याचे कारण म्हणजे आर्थिक वर्षाच्या अखेरीस, मार्च महिन्यात सर्वच कंपन्या आपापली विक्रीचे वार्षिक लक्ष्य पूर्ण करण्यासाठी अधिकचा जोर लावतात आणि त्यामुळे वर्षातील सर्वाधिक मासिक जीएसटी संकलन हे एप्रिलमधेच होते. या वर्षीच्या एप्रिलमध्ये २.१ लाख कोटी रुपयांचा संकलनाचा पल्ला गाठला असला तरी सन २०२४-२५ या वर्षासाठी दरमहा सरासरी करसंकलन १.८ लाख कोटींच्या आसपास राहणे अपेक्षित आहे. गेल्या वर्षी एप्रिल २०२३मध्ये जीएसटी संकलन १.८७ लाख कोटी रुपये, तर संपूर्ण २०२३-२४साठी मासिक सरासरी ही १.६८ लाख कोटी रुपये इतकी होती.सन २०१७मध्ये अनेक घटकांचा रोष पत्करून, अगदी राजकीयदृष्ट्या आत्मघातकी ठरू शकेल असा हा आमूलाग्र बदल सरकारने अंमलात आणला. त्याद्वारे विविध अप्रत्यक्ष कर ह्या एकाच करात समाविष्ट झाले; पण त्याचबरोबर मासिक, तिमाही आणि वार्षिक परतावे भरण्याचा भार लहानमोठ्या सर्व व्यावसायिक आस्थापनांवर पडला. संपूर्ण डिजिटल प्रणालीमुळे करचोरीच्या संधी कमी झाल्या आणि करचुकव्यांना आळा बसला. हे जे सुधारणेचे लहानसे रोप सात वर्षांपूर्वी लावले होते त्याची फळे आता आपल्याला बघायला मिळत आहेत. अर्थात मधल्या काळात अनेक बदल, दुरुस्त्या त्यात करण्यात आले, आणि त्यात सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांचा सहभाग असलेल्या 'जीएसटी कौन्सिल'ने महत्वाची भूमिका बजावली, हे नमूद केलेच पाहिजे. अर्थ मंत्रालयाने देखील कसून तपासणी आणि आग्रही वसुलीसाठी बरेच प्रयत्न केले आणि त्याचाही विक्रमी करसंकलनासाठी उपयोग झाला.सात वर्षांपूर्वी भारतात सर्वत्र जीएसटी लागू करणे हे खरोखरच शिवधनुष्य उचलण्यासारखे कठीण काम होते. कारण जुन्या करप्रणालीतील अकार्यक्षमतेत केंद्र सरकार, राज्य सरकारांपासून, नोकरशाही ते लहान उद्योजकांपर्यंत सगळ्यांचे हितसंबंध गुंतलेले होते. अप्रत्यक्ष कर लावण्याचा राज्य सरकारांचा अधिकार जीएसटीने जाणार होता. तर उद्योगजगात कुठल्याही नियमांच्या अनुपालनात (लोश्रिळरपलश) असणारे औदासिन्य आणि कर भरायला लागणे म्हणजे पैसे फुकट गेले, अशी भावना या देखील अशा बदलाला विपरीत होत्या. त्यामुळेच सन २०००मध्ये केळकर समितीने सुचवलेली ही सुधारणा प्रत्यक्षात यायला एवढा मोठा काळ गेला.कुठल्याही सरकारसाठी करसंकलन वाढते असणे हे विकासकामांसाठी महत्त्वाचे असते. भारताला तर दुहेरी कामगिरी साधायची आहे. एकीकडे दशकानुदशके दुर्लक्षित राहिलेल्या पायाभूत क्षेत्रात अद्ययावत सुविधांची निर्मिती करायची आहे; तर दुसरीकडे वित्तीय तूट कमी करून देशावरील कर्जाचा बोजा कमी करायचा आहे. जीएसटीचे दमदार संकलन आणि सातत्याने होणारी वाढ हे यासाठी अत्यंत मोलाचे आहे. थोडी बाहेरच्या जगात नजर टाकली तर आजच्या घडीला अमेरिकेपासून ते युरोप किंवा जपानपर्यंत असंख्य देशांची सरकारे करोनाकाळात वाढलेले कर्जाचे बोजे हलके करण्यासाठी आपापले कर उत्पन्न वाढवण्यासाठी जंग जंग पछाडत आहेत.जीएसटीचे दमदार संकलन हे केवळ केंद्र सरकारचे उत्पन्न वाढणे आणि अर्थसंकल्पीय तूट कमी होणे एवढ्यासाठीच महत्त्वाचे नाही; तर त्यातून संपूर्ण देशाचा विकासाचा जोमही दिसून येतो. डिसेंबर २०२३च्या तिमाहीत ८.४ टक्के विकासदर नोंदवल्यावर आता मार्च २०२४च्या तिमाहीचे विकासाचे आकडे देखील चांगलेच येतील, असे या जीएसटी आकड्यांवरून दिसते आहे. त्यामुळे २०२३-२४ वर्षासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी किंवा जागतिक बँक इत्यादींच्या अंदाजापेक्षा भारताचा विकासदर अधिक दिसू शकेल. नुकतेच प्रसिद्ध झालेले एप्रिल २०२४ महिन्यासाठीचे 'पर्चेसिंग मॅनेजर्स इंडेक्स'चे आकडेदेखील याला दुजोरा देतात. वस्तू उत्पादन क्षेत्रातील कंपन्यात पर्चेस डिपार्टमेंट सांभाळणाऱ्या अनुभवी व्यवस्थापकांचे हे सर्वेक्षण मोठ्या प्रमाणावर कच्च्या मालाची वाढती मागणी दर्शवतो आहे. कुठलीही कंपनी जेव्हा तिच्या तयार मालाला उठाव असतो तेव्हाच त्यासाठी लागणारा कच्चा माल जास्त प्रमाणात खरेदी करते. त्यामुळे अशा सर्वेक्षणांना अर्थशास्त्रात भविष्याची आधी सूचना देणारे घटक म्हणून मान्यता आहे.जीएसटीचा आणखी एक परिणाम म्हणजे अनेक लहान कंपन्या किंवा लघुउद्योजक जे पूर्वी करसंकलनाच्या कक्षेबाहेर राहून अर्थार्जन करायचे त्यांना आता जीएसटीसाठी नोंदणी करणे आणि रिटर्न भरणे अनिवार्य होऊ लागले आहे. त्यामुळे औपचारिक अर्थव्यवस्थेत ते समाविष्ट होऊ लागले आहेत. याचा लघु उद्योजकांना होणारा एक फायदा म्हणजे सरकार-प्रमाणित जीएसटी आकडेवारी दाखवून त्यांना आता बँका किंवा तत्सम संस्थात्मक अर्थपुरवठा मिळवता येतो. अन्यथा खेळत्या भांडवलासाठी अ-संस्थात्मक मार्गाने कर्ज घेणे म्हणजे व्याजाचा डोंगर अंगावर ओढवून घेणे अशी परिस्थिती असते. त्या तुलनेने कमी व्याजदराने मिळणारा हा कर्जपुरवठा व्यवसायवृद्धीसाठी फार उपयोगी पडू शकतो. अर्थात अजूनही मोठ्या प्रमाणावर रोखीत व्यवहार चालतात आणि ग्राहकांचा कल देखील कच्ची पावती घेऊन कर टाळण्याकडे असतो.भारतातील विविध राज्यांचा विचार केल्यास या महिन्याच्या जीएसटी संकलनाच्या आकडेवारीतून उत्तर प्रदेशची विकासाची घोडदौड अधोरेखित झाली आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि गुजरातपाठोपाठ आता उत्तर प्रदेशने तब्बल १९ टक्के वृद्धी नोंदवत तमिळनाडूला मागे टाकत चौथा क्रमांक पटकावला आहे. २०२३-२४ वर्षात सातत्याने तमिळनाडूपेक्षा सरासरी सुमारे १० टक्के कमी जीएसटी संकलन असणारे उत्तर प्रदेश अचानक एप्रिल २०२४मध्ये तमिळनाडूच्या पुढे गेले. उत्तर प्रदेशची ही चमकदार कामगिरी भविष्यात कितपत टिकून राहते, ते आत्ताच सांगणे कठीण आहे. मात्र आर्थिक विकासाची घोडदौड एखाद्या मागास राज्याचे देखील पुनरुत्थान करू शकते, हे यातून अधोरेखित होते. याउलट ईशान्येकडील राज्ये आणि अंदमान, निकोबार किंवा लक्षद्वीप सारख्या केंद्रशासित प्रदेशातील जीएसटी संकलन घटलेले दिसले. सध्या चालू असलेल्या उष्णतेच्या लाटेमुळे जूनच्या तिमाहीत मासिक जीएसटी संकलन घटू शकेल, मात्र पावसाळ्यासोबत ते पुन्हा पूर्वपदाला येईल.या सगळ्याचा विचार करताना आपण हे लक्षात घ्यायला पाहिजे की, जीएसटीमधून आत्तापर्यंत प्राप्त झालेले यश हे उत्साहवर्धक असले तरी ते काही अंतिम साध्य नव्हे. जीएसटीमध्ये अजूनही अनेक मोठे बदल होणे गरजेचे आहे. पेट्रोलियम पदार्थांना त्याखाली आणणे असो, किंवा जीएसटीच्या अनेकविध दरांऐवजी सर्वच सेवा आणि वस्तूंसाठी एक किंवा दोनच दर लागू करणे असो, दर कमी करून ग्राहकांना कर भरण्यासाठी प्रोत्साहित करणे असो किंवा रिफंड-सहित संपूर्ण प्रणाली सुलभ करण्याविषयी उचलायची पावले असोत, अनेक ठिकाणी सुधारणांना वाव आहे आणि त्या सुधारणा सुयोग्य पद्धतीने होत राहणे हे फार महत्त्वाचे आहे. मात्र, एप्रिल २०२४चे जीएसटीचे आकडे एवढे नक्कीच दर्शवतात की भारताने सन २०१७मध्ये उचललेले पाऊल हे योग्य दिशेने होते आणि राजकीय इच्छाशक्ती असेल तर अत्यंत आमूलाग्र स्वरूपाच्या आर्थिक सुधारणा घडवून आणणे आणि त्या सातत्याने सुधारत यशस्वी करणे हे भारताला आणि भारतीयांना नक्कीच जमू शकते. भारताच्या दूरगामी प्रगतीचा पाया मजबूत करण्यासाठी ही क्षमता आवश्यक असेल.



**प्रति**
**प्रिय बाबा,**

होय बाबा आज अचानक तुमच्या पर्यंत, खूप दिवस झालेत बोलायच राहून गेलं, तुम्ही गेलात आणि आम्ही पोरके झालो. आज इथ पर्यंत पोहाचलोय याचा आनंद आहेच. पण तुम्ही नाहीत याची खंत मनाला लागून आहे. असो जन्माला येणारा प्रत्येक व्यक्ती एक दिवस जाणार आहेच पण जातांना माझा सारख्या व्यक्तीला तुमच्या सहवासात आयुष्य जगायला मिळालं हे महत्वाचं.

आज दिवसाची सुरुवात तुम्हाला वंदन करून, आज मी जो काय आहे तो तुमच्यामुळे, तुम्ही मला नेहमी कुठे ना कुठे घेऊन जायचे तिथे आपण एक नागरिक म्हणून जायचो आज त्यांच ठिकाणी आपण आपलं वेगळं अस्तित्व निर्माण केलं आहे. वादळांना भिडत तुम्ही दिलेल्या स्वाभिमानी जगण्याची प्रेरणा घेऊन नेहमी प्रामाणिकपने काम करण्याची भावना ठेवून मी योग्य निर्णय घेत असतो आणि हीच खरी संपत्ती तुम्ही मला दिली. नाही त मला काय त्याचे अस म्हणून मनात येईल तसं वेड वाकडं वागून तुम्ही दिलेल्या संस्कारांना कधीही ठेच पोहोचवणार नाही.

एक यशस्वी उद्योजक होऊन अनेक गोष्टी करायच्या हे स्वप्न स्वप्नच न राहता ते आता लवकरच पूर्ण होईल. जिथे अन्याय होत असेल तिथे सहन केला जाणारच नाही, आणि होय मी तुमच्या विचारांनी सोबत घेऊन सत्याच्या बाजूनेच उभा असेल हा गोष्टीचा सार्थ अभिमान आयुष्य भर असेल, तुम्ही म्हणायचा की ''नाही तो बोलतोय ते खरंच असणार आणि होय जे बोललो ते तुमच्या आशीर्वादाने शक्य च होत आहे. आयुष्याचा छोटोशा सुरुवातीस तुम्ही उपस्थित नव्हता आणि या नंतर देखील तुम्ही माझा समवेत नसला पण बाबा तुम्ही आज असता तर... जगातील सर्वात मोठा आनंद तुम्हाला असतां. माझे हितचिंतक आणि एक सच्चा दोस्त म्हणून तुम्ही मला मोठ केलं. आणि आज तुम्ही आयुष्य भर जिथे जिथे गेलाय तिथे तुमच्या सोण्यान हक्काचं घर तयार केलंय. आणि ते सुद्धा कायमसोरूपी. आज आयुष्याची २१ वर्ष पूर्ण झालीत या गोष्टींचा आनंद जेव्हढा नसेल त्याही पलीकडे तुमच्या विचारांनी मिळवलेली माणसं आहेत. ही गोष्ट मनाला आनंद देत राहते. दैनिक लोकनेता संपादक म्हणून अवघ्या महाराष्ट्रभर पोहचता आलं आणि आता लवकरच परत एक नवा विचार घेऊन फिरणार आणि तूमचे नी आमचे न करता सर्वांना आपलंसं करून एक नवी क्रांती नक्कीच घडवणार यात शंका नाही. बाबा शेवटी तुम्ही होता आणि आयुष्यभर माझा सोबत राहाल हेच आशीर्वाद माझा पाठीशी असूद्या आणि मला आयुष्यात खंबीर बनण्यासाठी उज्वल प्रेरणा द्या. एक दिवस ''माझाच घराला मी लावून आग जेव्हा, हिरो सीमा कधीही तुमचे करीन तेव्हा'', अशा वुक्ती प्रमाणे आयुष्य जगेल.

**इतकेच !!**

**तुमचाच**
**ज्ञानु**

# स्वप्नांच्या वाटेवरलं पहिलं वळण

अनंत सामंत यांच्या 'एमटी आयवा मारू' या कादंबरीनं मराठी साहित्यात पाण्यावरचं जग खुलं केलं. नंतर कादंबऱ्या आणि कथा संग्रहांमधून त्यांनी मराठी वाचकांपुढे एक वेगळं विश्व उभं केलं. त्यांच्या साहित्यात गुंफलेल्या आयुष्याच्या या आठवणी...



वळणा वळणानं खळाळत वाहणारी नदी भान विसरून पाहत असताना उगमाक्षणीच्या तिच्या दोन्ही काठांच्या अतूट एकसंधतेची जाणीवही उरत नाही जगाला. काठ दोन नसतातच... काठ एकच असतो, मातीच्या गर्भातून अवतरणाऱ्या नदीला सर्वांगानं कुशीत घेणारा... ती वाहील तसा वाहणारा, वळेल तसा वळणारा, कोसळेल तेव्हा झोकून देणारा. तिच्या स्वप्नांच्या जगात तिला शेवटपर्यंत सोबत करणारा... जमीन, उगम, काठ, प्रवाह, वळण, खळाळ, प्रपात सारं भिन्न भिन्न भासतं फक्त.

दुपारचं जेवण जड झालं होत. माश्याचं कालवण आणि आंबेमोहोर भात ओरपला होता. घाम पुसत ओटीवरल्या बाकड्यावर विसावलो होतो. शहात्तर सत्त्याहतर साल असेल. ती चौदा पंधराची होती. लहानगी. घरातल्या दहा पंधरा माणसांच्या गर्दीत हरवून गेलेली. क्वचित समोर येणारी. क्वचित कोणाशी बोलणारी. तरीही लक्ष वेधून घेणारी. दुरून माझ्याकडे पाहणारी. नजरानजर झाल्यावरही नजर न वळवणारी. दोन्ही हात कंबरेवर ठेऊन ती माझ्या समोर उभी ठाकली. 'येतोस फिरायला?' तिनं थेट विचारलं. पाच दहा म्हातारे अवतीभोवती विसावले होते. 'येतोस, काय? तुझ्या बरोबरीचा आहे तो?' कोणी वडीलधारं दरडावलं. एक निर्विकार नजर त्याच्याकडे टाकून ती परत माझ्या दिशेनं वळली. सूर्य माथ्यावर होता. मे रणरणत होता. तापल्या वाटांचे चटके चुकवत माती चौफेर उडत होती. मी अविश्वासानं तिच्याकडं पाहिलं. बाकड्याखालच्या रबरी स्लिपर्स गोऱ्या पावलांत सरकवून ती पायऱ्याही उतरली. अंगात परकर पोलका. गुडघ्यांपर्यंत पोचणारी केसांची काळीभोर जाड वेणी, आणि त्यात अलगद खोचलेला कवठी चाफ्याचा शुभ्र कळा. उत्सुकतेने मी तिच्या पाठोपाठ निघालो. दोन तीन किलोमीटरचा फुफाट्यागत रस्ता तुडवत तिनं मला समुद्राकाठच्या सुरूच्या बागेत आणलं. नव्यानेच लावली असावीत झाडं. फक्त आठ दहा फूट उंच वाढली होती. थंडगार दाट सुरूच्या आणि तापल्या वाळूच्या सीमेवर आम्ही बसलो. समोर अजस्त्र सागर पेटला होता. दूर मच्छिमार बोटी तरंगत होत्या आणि त्या पलीकडे समुद्र कापत जाणारी जहाजं. काही क्षण ब्रीज-वॉच वर आल्याप्रमाणे मी त्यांच्या दिशा, वेग सवयीनं जोखत राहिलो. मग तिची नजर जाणवली. मी तिच्याकडे पाहिलं आणि पहिल्यांदा तिच्या इवलुश्या निरागस डोळ्यांतलं व्याकूळ एकलेपण मला दिसलं. समुद्रात, आभाळात तिचं जग हरवलं असल्यासारखं ती सभोवताल मुक्यानं न्याहाळत राहायची. क्वचित काही बोलायची. आठवडाभर होतो मी गावात. आठवडाभर, रोज भर दुपारच्या वणव्यात आम्ही नेमानं समुद्रावर जात होतो. देवळात पिंडीवर टांगलेल्या अभिषेकाच्या तांब्याच्या कलशावर समईच्या ज्योतीचा मंद प्रकाश पसरल्यासारखा चेहरा लालबुंद व्हायचा तिचा समुद्रावर पोहोचेपर्यंत. आणि गाभाऱ्याच्या बंद दारांच्या गजांतून दिसणाऱ्या एकाकी निरांजनातल्या ज्योतीची व्याकुळता डोळ्यांत. मला डिक्शन होत होतं या साऱ्याचं.दुसऱ्या तिसऱ्या दिवशी तिला शब्द सापडू लागले. हळूहळू बरोबरीच्या मैत्रिणीशी बोलावं तशी ती माझ्याशी बोलू लागली...तू जहाजावरून घरी लिहिलेली पत्रं घेऊन तुझे वडील येतात इथे. मग सगळे जमतात. तुझ्या पत्रांचं सामूहिक वाचन होतं मोठ्यानं. नंतर त्यावर चर्चा रंगते. प्रत्येक जण स्वतःचा अंदाज बांधतो. कधी तू थकलेला - कंटाळलेला वाटतोस त्यांना. कधी रमलेला, कधी प्रेमात पडलेला. तू तिथल्याच कुठल्यातरी मुलीशी लग्न करणार असा अंदाज बांधतात सगळे कधीतरी. मग हमखास तुझ्या लग्नाचा विषय निघतो. इथल्या मुली ठरवूनही ठेवल्यात काहींनी. त्या सगळ्यांना तू जाम ग्रेट वाटतोस. सिंदबादसारखा. तुझ्या एकेका पत्रातलं एकेक साहस महिना महिना पुरतं त्यांना चघळायला...बोलता बोलता ती किंचित हसते. जणू माझ्या पत्रातल्या प्रत्येक शब्दाच्या खोलीचा नेमका थांग फक्त तिलाच लागतो. तिचं हसणंही मोजून मापून. नजरेतल्या व्याकुळतेला धक्का बसू नये इतपत. हसली की ती आणखीनच बाळ दिसते. निरागस. तिचं मोठ्ठ्यानं हसणं हरवलं असावं कधीतरी. तिला खळखळून हसवावसं वाटतं मला.दुसऱ्या दिवशी मी जीन्सच्या खिशात राहील एवढा माझा कॅसेट प्लेअर बरोबर घेतो. पण हसवणाऱ्या किशोरपेक्षा तिला जॉन लेनॉनचं ळारसळपश आवडतं, -You may say I am a dreamer, but I am not the only one. तिला Beatles, abba, Paul - nka आवडतात. त्यांची गाणी ती परत परत ऐकते. अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करते. गाणी ऐकताना तिचे पाय थिरकत नाहीत. डोळे नाचतात. मला ती बरोबरची वाटायला लागते. पत्रात लिहिता येत नाहीत अशा जहाजी आयुष्यातल्या घटना आता मी तिला सहज सांगू शकतो. त्या ऐकताना ती कधी दयार्द्र नजरेनं माझ्याकडे पाहत राहते. कधी खट्याळ हसते.एकदा तिनेच मला विचारलं, किती एकाकी वाटत असेल ना तुला इथल्या आपल्या माणसांत, गावात, या एवढ्याशा जगात. हरवून गेल्यासारखं. तुझ्या डोळ्यांत स्पष्ट दिसतं ते, इथल्या गर्दीतलं तुझं एकटेपण. तिथेच राहा तू. इथे तुला भावेल असं काही नाही.गावाहून परत जाताना मला निरोप द्यायला दारात जमलेल्या गर्दीत ती सगळ्यांत मागे होती. उंबरठ्याच्या आत. तिथल्या अंधुक प्रकाशातही तिच्या केसांत खोचलेला शुभ्र टपोरा कवठी चाफा स्पष्ट दिसत होता. टणक दिसला तरी नाजूक असतो हा चाफा. जरा बावरला तर पाकळ्या देठ सोडतात. त्यांना अलगद झेलायचं असतं तेव्हा, असं तिनं सांगितलं होतं.शीपवरून घरी पत्र लिहिताना, प्रत्येक शब्द लिहिताना माझ्या डोळ्यांसमोर आता ती असायची. जमलेल्या नातेवाईकांच्या घोळक्यासमोर वडील पत्र वाचताना, कोंडाळ्यापलीकडल्या धूसर प्रकाशात काहीशी दूर बसलेली ती मला स्पष्ट दिसायची. हळूहळू प्रत्येक पत्र मी तिच्यासाठीच लिहायला लागलो. शब्दांच्या अर्थाचा गंध काळ्या शाईतून कितीही खंड, समुद्र पार करू शकतो, कितीही काळ टिकू शकतो हे आयुष्यात पहिल्यांदा मला जाणवलं. त्यानंही झपाटलो मी. तिच्यासाठी लिहीत सुटलो. ती माझ्या लेखनाची सुरुवात होती. फक्त तिच्यासाठी लिहिलेल्या शब्दांची. त्याच्या कथा नंतर झाल्या, त्यालाही कारण होतंच.त्यानंतरच्या व्हॉयेजमध्ये एक फुटकं होडकं भर समुद्रात दिसलं आम्हाला. सहासात व्हिएतनामींचं युद्धात होरपळलेलं कुटुंब स्वतःचा देश सोडून जीव वाचवायला लाटा नेतील तिथे होडक्यातून निघालेलं. त्यांचं इंधन संपलेलं. खायला अन्न उरलं नव्हतं. शिड फाटलेलं. चारही दिशांना फक्त खारा समुद्र. रेड चायनाला जाणाऱ्या आमच्या जहाजावर ते येऊ शकत नव्हते; पण होडक्याच्या कठड्याशी जमून सारे अन्न, पाणी, इंधनासाठी याचना करत होते. त्यांच्यापैकी एक सोळा सतरा वर्षांची मुलगी या लाचार कोलाहलापासून दूर, डोलकाठीला पाठ टेकून उभी होती. पाठल्या डोलकाठीला तिनं दोन्ही हातांनी मिठी घातली होती. डोलत्या होडक्यात दोन्ही पावलांवर सहज तोल सांभाळत ती क्षितिजावर चढणारा सूर्य न्याहाळत होती. मी ड्युटीवर होतो. जहाजाच्या वरच्या टोकावरून, ब्रीजवरून तिला न्याहाळत होतो. न राहवून मी दुर्बीण उचलली. माझी नजर जाणवून तिनं माझ्याकडे पाहिलं. थेट नजरेला नजर भिडली. त्या डोळ्यांत ना भीती होती ना याचना. जेवढं सहज सूर्याचं उगवणं स्वीकारावं तेवढ्याच सहजपणे तिनं तिची नियती स्वीकारली होती. त्या कोलाहलात ती एकटी होती. तिला आधीही भेटल्यासारखं वाटलं मला. सुरूच्या बागेच्या काठावर. तसेच इवले इवले डोळे. डोळ्यांत तोच बिनधास्त आत्मविश्वास, स्वाभिमान आणि व्याकूळ भाव. त्या व्याकुळतेत सल नव्हती; शोधत असलेल्या विश्वाची विरही आस होती. ती तनहाई होती.पूर्वी कधीतरी तनहाई या शब्दाचा अर्थ शोधून थकलो होतो. आज त्या डोळ्यांतल्या तनहाईत तन्हा झालो होतो. भर रेड चायना सीमध्ये मी एकाकी झालो होतो. ते होडकं दूर गेल्यावर तासाभरात घोंघावलेल्या रौद्र वादळानं ते होडकं तिच्यासकट बुडवलं. ते सारं घडलं तसं मी पत्रातून घरी कळवलं. त्या अनोळखी व्हिएतनामी मुलीसाठी दूर गावात व्याकूळ होणाऱ्या ओळखीच्या नजरेत कितीतरी दिवस भिजत राहिलो.

कित्येक वर्षांनी ती, माझी पहिली कथा 'स्त्री' मासिकात प्रकाशित झाली. नंतर एका कथासंग्रहात आली. तनहा क्षण मात्र अप्रकाशित राहिले. एक कायम लक्षात राहिलं... सुरूच्या बागेत तिला माझ्या डोळ्यांत दिसलेली तन्हाई. मला तनहा म्हणणारी मला भेटलेली ती एकुलती. एकटं वाटायचंच मला ती भेटण्याआधी, पण ती भेटल्यानंतर जे वाटू लागलं, ते वेगळं काय होत? तनहाईच होती ना ती! अधिक तन्हा करणारी. वाहत्या प्रवाहाला शब्दांच्या कवेत घेण्याचा खुळा प्रयत्न करणाऱ्या लेखकाच्या तनहाईचं पाहिलं पान. स्वप्नांच्या वाटेवरलं पाहिलं वळण.

# जिल्हा रुग्णालयात 'एमआरआय' मशिन अभावी तर स्वरातीचे सिटी स्कॅन ४ महिन्यांपासून बंद रूग्णांची हेळसांड ; शासनकर्ते उदासीन-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

सध्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी असुन विकासाच्या पोकळ गप्पा मारणाऱ्या लोकप्रतिनिधी आणि शासनकर्ते यांची सर्वसामान्य लोकांना आरोग्य सुविधा देण्याबाबत उदासिनता दिसून येत असुन जिल्ह्यातील सर्वांत मोठी आरोग्य संस्था असलेल्या जिल्हा रुग्णालयात अपघात,मेंदुत ताप गेलेले रूग्ण, शरीरातील नसांच्या वेदना आदि आजारांचे निदान करण्यासाठी आवश्यक असणारे एमआरआय मशिन सारखे उपकरण उपलब्ध नसल्याने निदान व उपचारास उशिर होत रूग्णांची हेळसांड होत असुन खाजगी केंद्रात जाऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे तर अंबेजोगाई येथील स्वरातीतील सिटी स्कॅन मशिन वारंवार नादुरुस्त असल्याने ४ महिन्यांपासून बंद आहे त्यामुळे तातडीने जिल्हा नियोजन निधीमधून निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर,शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, मुस्ताक शेख यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्य मंत्री, आरोग्य सचिव, पालकमंत्री बीड यांना केली आहे. राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने १५ आगस्ट २०२३ पासुन सर्व तपासण्या आणि उपचार मोफत करण्याचा निर्णय घेतला आहे.मात्र औषधी,उपकरणे आणि तज्ञ पुरवताना हात आखडता घेतला असुन यामुळे सामान्य रूग्णांची हेळसांड होत असुन बीड जिल्हा रुग्णालयात रोज आंतररुग्ण विभागात ५०० च्या वर रुग्ण असतात तर बाह्यरुग्ण विभागात तपासणीसाठी ७०० हुन अधिक रुग्ण येतात.दरम्यान अपघाती रुग्ण , मेंदुत ताप गेलेले रुग्ण, शरीरातील नसांच्या वेदना आदि आजारांचे निदान करण्यासाठी एमआरआय मशिनसारख्या उपकरणांची आवश्यकता असते.बीड जिल्हा रुग्णालयाला ७० वर्षे कालावधी उलटूनही जिल्ह्यातील सर्वात मोठी आरोग्य संस्था असलेल्या जिल्हा रुग्णालयात हे उपकरण नाही.या उपकरणासाठी सामाजिक कार्यकर्ते




यांनी आंदोलने करूनही शासनकर्ते आणि धोरणकर्ते यांच्यात फरक पडला नाही. जिल्हा रुग्णालयात एमआरआय मशिन उपलब्ध नसल्याने जिल्हा रुग्णालयात आलेल्या रूग्णांची एमआरआय उपकरणाद्वारे तपासणी करायची असेल तर त्याला खाजगी केंद्रात तपासणीसाठी जावे लागते.आजारी रूग्णांची यामुळे फरपट होते.येण्याजाण्याच्या वेळेमुळे आजाराचे निदान व उपचार होण्यास उशीर होतो आणि तपासणी शुल्क भरावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. त्यामुळे एमआरआय मशिनसाठी जिल्हा नियोजन निधीतून निधी उपलब्ध करून देण्यात यावा.ग्रामीण भागातील सर्वसामान्य रुग्णांचा आधार असलेल्या स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील सिटी स्कॅन मशिन दुरुस्तीचे प्रयत्न निष्फळ ठरले असुन गेल्या ४ महिन्यांपासून मशिन बंद अवस्थेत आहे.त्यामुळे रूग्णांना खाजगी सिटी स्कॅन केंद्राचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे.अंबेजोगाई येथील स्वाराती रूग्णालयातील सिटी स्कॅन मशिनला १२ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असल्याने त्याचे अपग्रेडेशन अथवा नविन यंत्राचे भाग बसवावे लागतात.मध्यंतरी जिल्हा नियोजन निधीतुन उपलब्ध झालेल्या ८० लाख रुपये निधीतुन अपग्रेडेशनसाठी संबंधित कंपनीच्या अभियंत्यांच्या पथकाने ३ दिवस काम करून यंत्र सुरू केले मात्र पुन्हा एक तसातच बंद पडले.दुसरा यंत्राचा भाग निकामी झाल्याचे अभियंत्याने स्वराती प्रशासनाला कळवले असुन रुग्णांची हेळसांड होऊ नये यासाठी नविन सिटी स्कॅन मशिनची आवश्यकता असुन त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

## ४३ माढा लोकसभा मतदारसंघाचा

# एकच ध्यास महायुतीचे उमेदवार खा.रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांचा विजय हमखास

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खा.रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सांगोला शहर व तालुक्यात प्रचारात मोठी आघाडी घेतली असून मतदारांचा प्रतिसाद पाहता सांगोला तालुक्यातून महायुतीचे अधिकृत उमेदवार खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर मोठ्या मताधिक्याने निवडून येणार अशा प्रतिक्रिया सर्वत्र व्यक्त होत आहेत..माढा लोकसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मतदारांनी उस्फूर्तपणे मतदान करून खा . रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांना विजयी करावे. तसेच देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांना पुन्हा संधी देण्यासाठी कमळाला मतदान करावे असे आवाहन महायुतीचे पदाधिकारी ,कार्यकर्ते यांनी सांगोला शहरातील प्रचारादरम्यान केलेआहे . माढा लोकसभा मतदारसंघाचा एकच ध्यास खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा विजय हमखास. खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांना पुनश्च



एकदा सेवा करण्याची संधी देण्यासाठी त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन प्रचारकाकडून करण्यात आले आहे. महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्याकडून सांगोला शहरातील विद्यानगर ,मणेरी वस्ती ,आनंदनगर ,मार्केट यार्ड परिसर ,साळे कॉलनी, यशनगर ,,साठेनगर ,धनगर गल्ली, भारत गल्ली, कचेरी रोड पूर्व -पश्चिम बाजू परिसरात होम टू होम प्रचार करण्यात आला. सांगोला शहरातील या प्रचार दौऱ्यामध्ये माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा राणीताई माने , मा.गटनेते तथा नगरसेवक आनंदाभाऊ माने, ,मा,नगरसेविका छायाताई मेटकरी, मा.नगरसेवक माऊली तेली, मा.नगराध्यक्ष नवनाथभाऊ पवार ,उद्योगपती आनंद घोंगडे, मा . नगरसेवक अस्मिर तांबोळी, मा नगरसेविका अप्सराताई ठोकळे, मा. नगरसेवक सोमेश यावलकर, भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत सुपेकर, भाजपचे शहराध्यक्ष प्रवीण जानकर ,चेअरमन लतिका मोटे, , मायाका प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशिलिंग गावडे, अरुण पाटील ,भाजप शहर उपाध्यक्ष लखन पवार, सोमनाथ ठोकळे ,व्यापारी सेल शहराध्यक्ष राहुल दिवटे, राजेश खडतरे, विनोद रणदिवे, सचिन सादिगले, सुरेश सादिगले ,शंकर खाडे ,सुनील खंदारे ,चेअरमन प्रभाकर घोंगडे, आयुब मुजावर, सुनील पवार, जय बनसोडे, ऋषी जानकर, कीर्तीपाल बनसोडे, सुनील मेटकरी, अनिल जानकर ,युवा नेते काशिलिंग गाडेकर, शिवाजी गावडे, शाहिद मुलाणी, रोहित गेजगे ,सुमित भोसले, राहुल दिवटे, अमित पोरे,,चैतन्य राऊत ,प्रवीण गावडे ,रेशमा मुजावर, शांता हाके,अनुराधा माने, सुवर्णा जाधव ,अश्विनी दोलतडे,सुवर्णा गडदे, करिश्मा मुजावर, ललिता खाडे , फर्जाना मुजावर, अरुणा माने, रुकसाना मुजावर, शोभा जाधव, मनीषा दहिवडकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान मध्ये सेवानिवृत्ती सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

नुकताच उत्कर्ष बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका सौ .सुनीता कुलकर्णी व सहशिक्षिका सौ. राजाक्का साळुंखे यांचा सेवानिवृत्ती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. संजीवनी केळकर व संस्थेच्या कोषाध्यक्ष डॉ.शालिनी कुलकर्णी उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर माध्यमिक विभागाचे प्राचार्य सुनील कुलकर्णी सर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे बाई सेवानिवृत्त नायब तहसीलदार पी .व्ही .कुलकर्णी, विश्वनाथ कुलकर्णी प्राचार्य आनंद कुलकर्णी, मारुती साळुंखे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी प्रतिमा पूजन व स्वागत गीत शुभांगी कवठेकर यांनी गीत गायन केले. सौ सुनीता कुलकर्णी यांचा सत्कार संस्था अध्यक्षा डॉ. संजीवनी केळकर व राजाक्का साळुंखे यांचा सत्कार संस्थेच्या कोषाध्यक्ष डॉ. शालिनी कुलकर्णी यांनी केला. डॉ. संजीवनी केळकर यांनी आपल्या मनोगतात बोलताना राजाक्का साळुंखे यांना रणरागिनी म्हणून उल्लेख करून त्यांची पार्श्वभूमी विशद केली. शालिनी कुलकर्णी यांनी बाल शिक्षण व बाल संस्काराचे कार्य अमूल्य असून त्याचे योगदान नवीन पिढीला प्रेरणादायी आहे असे गौरवास्पद





वाक्य म्हटले . यावेळी प्रत्येक विभागातील शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. बालक मंदिर विभागातून स्वप्ना कुलकर्णी, मनीषा पाटणे प्राथमिक विभागातून वर्षा रस्ते माध्यमिक विभागातून प्राचार्य सुनील कुलकर्णी सर,संस्था कार्यालयातून मंगल कुलकर्णी व सुनीता कुलकर्णी कुटुंबातील त्यांचे भाऊ प्राचार्य अनंत कुलकर्णी सर व त्यांची भाची सून वैष्णवी कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.प्रास्ताविक संध्या शास्त्री यांनी केले तर सूत्रसंचालन धनश्री सोनंदकर यांनी केले.

# जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा हतीदच्या विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेत यश

## अक्षरगंगा प्रज्ञाशोध राज्यस्तरीय परीक्षेमध्ये आराध्या अजित पवार राज्यात पाचवी












■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

आपल्या महाराष्ट्र राज्यात अक्षरगंगा प्रज्ञाशोध राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा २०२४ घेण्यात आली होती या स्पर्धा परीक्षा २०२४ चा राज्यस्तर, जिल्हास्तर व बीटस्तर निकाल जाहीर झाला आहे.

यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा हातीदच्या विद्यार्थ्यांनी यशाची परंपराकायम राखली आहे. आराध्या अजित पवार १४२/१५० एवढे गुण संपादन करून राज्यामध्ये पाचवा क्रमांक पटकावण्याचा मान मिळवला आहे.तर जिल्ह्यात श्रेयश नंदकुमार बंडगर.१३८/१५० एवढे गुण मिळवून(जिल्ह्यात दुसरा क्रमांक)श्रद्धा शहाजी घाडगे १३४ १५० एवढे गुण मिळवून (जिल्ह्यात चौथा क्रमांक) श्रेया नंदकुमार बंडगर,१३४/१५० एवढे गुण मिळवून (जिल्ह्यात चौथा क्रमांक) कुमारी स्नेहल महादेव भंडगे१३४/१५० एवढे गुण मिळवून (जिल्ह्यात चौथा क्रमांक) पटकावला आहे. तसेच केंद्रातस्तरावर यश मनोज कुमार घाडगे १३०/१५० एवढे गुण मिळवून (केंद्रात प्रथम क्रमांक)पटकावला आहे तर काव्याश्री बापू कोळी-९०/१५० माऊली सचिन कोळी-७६/१५० यांनीही चांगले गुण मिळवले आहेत उल्लेखनीय बाब म्हणजे इयत्ता दुसरी मधील आठ पैकी सहा विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत सहभाग झाला आहे.या यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनकरणाऱ्या वर्गशिक्षिका...ज्योती विठ्ठल मोरे तसेच मुख्याध्यापिका ज्योती पवार सर्व शिक्षक सुनील गायकवाड, विद्या धोकटे, दिपाली स्वामी यांचे सांगोला शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले साहेब केंद्रप्रमुख आप्पासाहेब पवार सर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री संतोष कोळी उपाध्यक्ष शहाजी घाडगे व शा. व्य. समितीचे सर्व सदस्य,सरपंच शालिनीताई भगत उपसरपंच कुलदीप घाडगे व ग्रामपंचायत चे सर्व सदस्य,गावातील मान्यवर, पालक, ग्रामस्थ यांच्याकडून यशस्वी विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे अभिनंदन केले जात आहे.

# २०२४ ची लोकसभा निवडणूक हि संविधानाच्या रक्षणासाठी: बापूसाहेब ठोकळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

देशात सार्वत्रिक लोकसभा निवडणूक होत असून हि निवडणूक देशातील सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वपूर्ण आहे. गेल्या काही वर्षात देशातील सामाजिक आर्थिक आणि राजकीय स्थिती चिंताजनक बनली आहे. सर्वसामान्य जनतेच्या हिताचे निर्णय होताना दिसत नाहीत. भारत हा जगातील एकमेव असा देश आहे जिथे अनेक जाती-धर्माचे लोक एकत्र राहत आहेत. मात्र आता राजकीय स्वार्थापोटी जाती धर्माच्या नावाने समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. गत काही वर्षात देशात माहागाई बेरोजगारी मोठ्या प्रमाणत वाढली आहे. अल्पसंख्यांक दलीत आदिवासी वरील हिंसा वाढली आहे. धर्म आणि जातीयतेच्या नावाने हिंसा वाढली आहे. देशाची सामाजिक सुरक्षा, एकता आणि सलोखा असुरक्षित झाला आहे. सध्याच्या राजकीय आणि सामाजिक परस्थितीत सातत्याने संविधान वर घाला घालण्याचा प्रयत्न केला जात आहे. संविधान बदलण्याचा घाट आज काही मंडळींनी घातलेला दिसून येत आहे. या देशातील आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या वंचीताना संविधानाने दिलेले अधिकार नाकारण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. देशात शेतकरी आंदोलन, मणिपूर घटना, कामगार आंदोलन, बेरोजगारांचे आंदोलन मोठ्या प्रमाणात झाली आहेत. शिव शाहू फुले आंबेडकर यांना अभिप्रेत असणाऱ्या समाज निर्मितीसाठी संविधानाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. संविधानातील तरतुदी या देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने कवच असून ते काढून घेण्याच्या अनुषंगाने या देशातील धर्मांध शक्ती जाणून बुजून संविधानाची मोडतोड करू पाहत आहेत. सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर त्यांना हवे तसे नियम कायदे करण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशात राष्ट्रवाद आणि धर्माच्या नावावर सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम केले जात आहे. देशात महागाई,बेरोजगारी, अन्याय अत्याचार शिक्षण असे अनेक प्रश्न असताना या प्रश्नाला बगल देऊन जाती धर्माचे राजकारण केले जात आहे. संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन सातत्याने केले जात आहे किंवा ते मूलभूत अधिकार संपवू पाहत आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर सातत्याने बंधने आणली जात आहेत.

यावर्षी एकूण सात टप्प्यात हि निवडणूक होत आहे. यातील काही टप्पे झाले असून महाराष्ट्रासह देशात अनेक भागात निवडणुका होत आहेत. आजवर झालेल्या निवडणुका ह्या लोकहिताचा अजेंडा घेऊन होत होत्या मात्र आताच्या निवडणुकात तसे दिसत नाही. लोकांची सुरक्षा, लोकांचे मुलभूत अधिकार आणि हक्क, शिक्षण, आरोग्य, रोजगार, शेतीमाल हमीभाव, दारिद्र्य असे अनेक मुद्दे देशात असताना आताची धर्मांध शक्ती राष्ट्रवाद, धर्म आणि लाभार्थी या मुद्यावर निवडणुका लढवल्या जात आहेत. बहुजन, महिला, शेतमजूर व अन्य मागास घटकांना विकासापासून आणि त्यांच्या हकक आणि अधिकार या पासून वंचित करणारी आणि दूर ठेवणारी निती हाणून पाडणे गरजेचे आहे. संविधानाच्या रक्षणासाठी आणि लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी तसेच लोकांचे मुलभूत अधिकार अबाधित ठेवण्यासाठी महाराष्ट्रासह देशभरातील पुरोगामी आणि शिव-फुले-शाहू-आंबेडकरवादी चळवळीतील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन आपली राजकीय आणि सामाजिक भूमिका या निवडणुकीद्वारे पुढे आणली पाहिजे. या २०२४ च्या निवडणुकीमध्ये धर्मांध आणि जातीयवादी शक्तींना दूर करून शिव-शाहू- फुले-आंबेडकर-अहिल्या-सावित्री यांच्या विचारांची सत्ता आणण्यासाठी या निवडणुकीत सर्वांनी सहभागी व्हावे लागेल. गेल्या काही वर्षापासून मतदानाचा टक्का घसरत असून याचा फायदा जातीवादी आणि धर्मांध शक्तींना होत आहे. समाजातील सर्व घटकातील लोकांनी एकत्र येऊन हि लोकसभेची निवडणूक आपल्या ताब्यात घ्यायला हवी. या देशातील विषमतावादी आणि जातीयवादी लोक दूर करण्यासाठी संविधानाने दिलेल्या मतदानाचा अधिकारा बाबत जास्तीत जास्त लोकांना जागृत करून या निवडणुकीत मोठा सहभाग नोंदवून आपली परिवर्तनवादी भूमिका बजावली पाहिजे. तरच संविधान आणि संविधानाने दिलेले अधिकार सुरक्षित राहतील, लोकशाही जिवंत राहील.

# सात दशकानंतर आचार्य श्री महाश्रमण यांचे शहरात आगमन सात ते ११ में पर्यंत शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

जैन श्वेतांबर तेरापंथ धर्म संघाचे अकरावे आचार्य श्री महाश्रमण बांचे ८.१. साधुसंतासह मंगळवारी सात रोजी गोलवाडीत आगमन होणार आहे आचार्य संघाच्या मार्गदर्शनाखाली ।। में पर्यंत शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आचार्यश्री महाश्रमण अक्षय तृतीया प्रवास व्यवस्था समितीचे अध्यक्ष सुभाष नहार यांनी होटेल गिरनार येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी डी. अनिल नहार, सकल जैन समाजाचे महासचिव महावीर पाटणी याची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना ते म्हणाले की, जैन श्वेतांबर तेरापंथ धर्म संघाचे नवे आचार्य श्री तुलसीजी हे ६९ वर्षापूर्वी महावीर जयंती निमित्त शहरात आले होते, त्यावेळी त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले होते. त्यानंतर आता पहिल्यांदा अकरावी आचार्य श्री महाश्रमणजीचे शहरात आगमन होत आहे. प्रदीर्घ कालावधीनंतर आचार्य श्री शहरात येत असल्याने जैन समाजात उत्साहाचे वातावरण आहे.

आचार्य श्री महाश्रमणजी यांचे ८१ साधू संताच्या मार्गदर्शनाखाली शहरात सात ते ।। मे दरम्यान भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील प्रेसिडेंट लोन येथे गुरुवारी नऊ में रोजी सायंकाळी सात वाजता तप अनुमोदना गीत कार्यक्रम होणार आहे. सर्वात महत्त्वाच्या कार्यक्रम शुक्रवारी १० में या दिवशी अक्षय तृतीया वर्षात तपपार्ना महोत्सव होणार आहे.

# कधी पावसात भिजायचं, कधी रडायचं याने निवडणुका जिंकता येत नाहीत

## मंत्री गिरीश महाजनांचा शरद पवारांसह रोहित पवारांना खोचक टोला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जळगाव (वृत्तसंस्था)**

कधी पावसात भिजल्याने किंवा रडल्याने निवडणूका जिंकता येत नाहीत, मतदारांना तुम्ही किती दिवस भावनिक करसाल, कधी तरी विकासावर मत मागा, असा खोचक टोला गिरीश महाजन यांनी आमदार रोहित पवारांना लगावला.

बारामतीमध्ये रविवारी सुप्रिया सुळे यांच्या प्रचार सांगता सभेत बोलताना रोहित पवार भावुक झाले होते, त्यासभेवर बोलताना गिरीश महाजन यांनी शरद पवारांसह रोहित पवारांवर निशाणा साधला.गिरीश महाजन यांनी पुढे बोलताना पुन्हा उद्धव ठाकरेंवर प्रहार केला. ते म्हणाले की, उद्धव ठाकरे किती वर्ष आमच्या सोबत होते. त्यावेळी उद्धव ठाकरेंना सर्व गोड वाटलं का? ज्यावेळी सोबत होते त्यावेळी उद्धव ठाकरे हे नरेंद्र मोदींचे कौतुक करत होते. आता विरोधात गेले म्हणून काहीही बोलावं का?, आमच्या भरवशावरच तुमच्या १८ जागा निवडून आल्या. शिवसेनेचे खासदार, आमदार कुणाच्या भरशावर निवडून आले होते? आम्ही नसतो तर १५ आमदार तरी उद्धव ठाकरे यांना निवडून आणता आले असते का? याचे उत्तर उद्धव ठाकरेंनी द्यावं. मंत्री गिरीश महाजन यांनी शरद पवारांसह रोहित पवारांवर टीका केली. ते म्हणाले की, कधी पावसात भिजायचं, कधी रडायचं, कधी आजारी पडायचं हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. शरद पवारांची तब्येत खराब असते, त्यांच्या तब्येतीवर बोलणं उचित होणार नाही.मात्र रोहित पवार हे थोडं काही झालं की लगेच रडायला लागतात. मला वाटतं रडून निवडणुका लढता किंवा जिंकता येत नाहीत. तुम्ही फार वेळ मतदारांना भावनिक करू शकणार नाहीत. मला असं वाटतं की त्यांनी मुद्द्यावर बोलावं, विकासावर बोला कामावर बोलावं आणि त्यावरच मग मागितली पाहिजे.गिरीश महाजन म्हणाले की, संजय राऊत यांच्या जिभेला कुठलेही हाड नाही. कोणी स्वप्नातही विचार करू शकत नाही असं संजय राऊत बोलतात. संजय राऊत यांच्या बोलण्याला आता मी महत्त्व देत नाही. जनता ही संजय राऊत यांच्या बोलण्याला महत्त्व देत नाही. आनंद दिघे यांच्याकडून पद घेण्याचा उद्धव ठाकरेंचा डाव होता असा गौप्यस्फोट एकनाथ शिंदे यांनी केला आहे. त्यावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले की, एकनाथ शिंदे सांगत आहेत तर त्यात तथ्य असणारच आहे.एकनाथ खडसेंकडून रक्षा खडसेंचा प्रचार सुरू आहे. एकनाथ खडसेंच्या भाजप प्रवेशावर मात्र गिरीश महाजन यांनी चुप्पी साधली. एकनाथ खडसे हे रक्षा खडसे यांचा प्रचार करत आहेत हे चांगलं आहे. खडसेंच्या भाजप प्रवेशाबाबत माहिती नाही, माहिती मिळाल्यावर त्यावर नक्की बोलेन, असे म्हणत त्यांनी खडसेंना देखील टोला लगावला.



# ढाणकीतील अवैध मटका चालू असलेला बंद कधी होणार प्रशासनाला जाग येणार ?

## खुलेआम सुरू असलेल्या अवैध मटक्यावर पोलीस प्रशासन लगाम करणार का

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ढाणकी | सय्यद रहीम रजा**



ढाणकी शहरात सुरू असलेला खुलेआम मटका. यामुळे गाव खेड्याच्या लोकांची मटका लावण्यासाठी शहरात दिवसेंदिवस होणारी गर्दी दिसून येत आहे संबंधित पोलीस प्रशासनाला जाग येणार ? धानकी शहरात चौका चौकामध्ये अवैध मटका जोरात सुरू राहतो आता तरी शहरात खुलेआम सुरू असलेल्या अवैध मटक्यावर पोलीस प्रशासन लगाम कसणार का? पोलीस अधीक्षक महोदय याकडे गांभीर्याने लक्ष देऊन ढाणकी शहरात सुरू असलेले मटका शहरातून हद्दपार होणार का? याकडे ढाणकी वासियांचे लक्ष लागले आहे.

# संत एकनाथ महाराजांची वसंत पूजा उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पैठण | प्रतिनिधी**

श्री संत एकनाथ महाराजांचे समाधी मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे चैत्र व वैशाख या दोन महिन्यातील प्रत्येक दशमीच्या दिवशी श्रींचे समाधीस चंदन उटी लावण्याची परंपरा आहे. त्यानुसार चैत्र वद्य दशमी, शुक्रवार दिनांक ३ मे २०२४

रोजी संध्याकाळी ठीक ७:३० वाजता ब्रह्मवृंदांच्या मंत्र घोषात ही पूजा संपन्न करण्यात आली. नाथवंशज ज्ञानराज गोसावी यांनीनी ऊटीसाठी लागणारे चंदन उगाळून नाथ समाधीची विधीवत मंत्रघोषात पूजा केली. समाधीस विड्याच्या पानांची व फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. यावेळी शेकडो भाविकांनी कैरीचे पन्हे व फळ या ठराविक प्रसादाचा लाभ

घेतला. नाथवंशज सालकरी सरदार महाराज गोसावी, डॉ. मेघशाम महाराज गोसावी व सेवाधारी मंडळीनी सर्व व्यवस्था पाहिली. यंदाच्या वर्षी उन्हाचा तडाखा जास्त आहे. वैशाख महिन्याच्या शुद्ध व वद्य अशा दोन ऊटी पूजा पुढील महिन्यात संपन्न होणार आहेत. एकनाथ महाराजाना उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी पादुकावर चंदनाचा लेप लावल्या जातो. पूजा म्हणजे 'यथा देहे तथा देवे' या न्यायाने करायची असते अर्थात

आपण जशी आपल्या देहाची काळजी करतो तशीच आपण देवाची काळजी करुन विधिवत उपचार करणे असा त्याचा अर्थ होतो. एकनाथ महाराज प्रत्यक्ष महाविष्णूचे अवतार आहेत त्यामुळे त्यांची पूजाही तशीच होणे अपेक्षित असल्याने हा उपचार विधी करण्यात येत असल्याचे सालकरी नाथवंशज सरदार महाराज गोसावी, मेघश्याम महाराज गोसावी यांनी सांगितले.

# महाराष्ट्र मराठा सोयरीक, ही सामाजिक लोक चळवळ' निर्मलाताई दानवे यांनी जिवंत ठेवली-जवंजाळ पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन | राम शिंदे**

बुलढाणा २९.०१.२०१६ लां शहरामध्ये सुरू झालेली ही सामाजिक लोक चळवळ आज संपूर्ण राज्यामध्येच नव्हे तर संपूर्ण देशात पसरलेली आहे.आजमीतिला या सामाजिक लोक चळवळीच्या माध्यमातून देशांमध्ये जवळपास ४४ जिल्ह्यामध्ये तसेच इतर राज्यामध्ये लोक सहभागातून विनाशुल्क भोजनव्यवस्थेसह वधुवर परिचय मेळावे संपन्न झालेत.ही लोक चळवळ देशातच नव्हे तर परदेशी स्थायी झालेल्या समाज बांधवांच्या माध्यमातून परदेशामध्ये सुद्धा पोचलेली आहे.हरियाणा आंध्रप्रदेश मध्य प्रदेश गुजरात येथे सुद्धा या लोक चळवळीचे वधू वर परिचय मेळावे संपन्न झालेले आहेत. गुजरात मधील मेळावा संपन्न होत असताना या मेळाव्याचे खरे श्रेय द्यावे लागेल ते निर्मलाताई दानवे यांनाच.सिंहाचा वाटा त्यांचा या मेळाव्यामध्ये राहिलेला आहे.मागील वर्षी जालना जिल्ह्यामध्ये भोकरदन जाफराबाद येथे सुद्धा मोठ्या संख्येत या चळवळीचे कार्यक्रम संपन्न झालेत. मागील दहा वर्षापासून राज्यामध्ये जवळपास सोशल मीडियाचा आधार घेऊन व्हाट्सअप च्या माध्यमातून ३५० तालुक्यांमध्ये वधू वर व्हाट्सअप ग्रुप सुरू आहे.ग्रुपच्या माध्यमातून बायोडाटांची आदान प्रदान केल्या जाते एवढ्यावरच न थांबता स्थानिक समाज बांधवांच्या माध्यमातून वधू वर परिचय मेळावे सुद्धा प्रत्येक तालुक्यात संपन्न झाले. यामुळे समाजामध्ये जटिल झालेला विवाह विषयक प्रश्न सोपा झालेला आहे कमी झालेले जमिनीचे क्षेत्र नोकरी विषयक प्रश्न यामुळे समाजामध्ये संबंध जुळून येणे मोठे अवघड काम झालेले आहे.एवढा मोठा या लोक चळवळीच्या डोलारा सांभाळण्याकरता सौ निर्मला ताई दानवे पाटील यांनी सतत या लोक चळवळीला आधार दिलेला आहे.मागील वर्षी भोकरदन मेळाव्यामध्ये सुद्धा मेळाव्यातील संपूर्ण भोजन व्यवस्था ची जबाबदारी सौ निर्मलाताई दानवे यांनी स्वतःच्या अंगावर घेतलेली होती.जाफराबाद मेळ्यामध्ये सुद्धा मोठा हातभार त्यांनी लावलेला होता.त्यांच्या सहकार्यातून अनेक मेळावे राज्यामध्ये संपन्न झालेले आहेत.



# ट्रकची टिप्परला समोरून धडक

## एक ठार, एक गंभीर जखमी




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेडराजा | ज्ञानेश्वर बुधवत**

मेहकर-जालना महामार्गावरील किनगावराजानजीक दिनांक ५ मेच्या रात्री ११ वाजेच्या सुमारास समोरून विरुद्ध दिशेने येणार्या ट्रकने टिप्परला जबर धडक दिली. यामध्ये टिप्पर चालक प्रवीण मुळे यांचा जागीच मृत्यू झाला असून, ट्रकचालकसुद्धा गंभीर जखमी झाला आहे. जखमीवर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

सविस्तर वृत्त असे, टिप्पर क्रचक२८इल१४३१टिप्पर चालक प्रवीण मुळे हे दुसरबीडवरून सिंदखेडराजाकडे जात असताना, ट्रक चालक पुंजाराम कोसरे हे सिंदखेडराजाहून दुसरबीडकडे येत होते. किनगावराजादरम्यान कोसरे यांनी त्यांच्या ताब्यातील ट्रक भरधाव व निष्काळजीपणे विरुद्ध दिशेने चालवून टिप्परला समोरून जबर धडक दिली. यामध्ये टिप्पर चालक प्रवीण मुळे राहणार खंडाळा, ता. लोणार यांचा जागीच मृत्यू झाला, तर स्वतः पुंजाराम कोसरे, रा. पोरगव्हाण, ता. आष्टी, जि. धुळे हासुद्धा गंभीर जखमी झाला आहे. अशा प्रकारच्या बाळकृष्ण काटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किनगावराजा पोलीस स्टेशनमध्ये ट्रक चालकाविरुद्ध कायमी अप नंबर १०७/२०२४ कलम २७९,३०४ अ ४२७ भा.द.वी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेचा पुढील तपास किनगावराजा पोलीस स्टेशनचे विष्णू मुंडे हे करीत आहेत.

# समाज सेवाकाकडून मतदान जन जागृती करण्यासाठी सायकल ला बोर्ड लावला




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी | मलकापूर**

मतदान हा मतदाराचा हक्क आहे. परंतु अनेकांकडून मतदान करण्याकडे दुर्लक्ष केले जाते. तेव्हा मतदारांना मतदानाविषयी जागृत करीत त्यांना आपल्या हक्काची जाणिव करून देण्यासाठी येथील सामाजिक कार्यकर्ते, सेवानिवृत्त कर्मचारी हरीदास गणबास हे सायकलवर 'छोडो अपने सारे काम, पहले करे मतदान' असे पोष्टर लावून मतदान जनजागृती करीत आहेत.

मतदानाकडे अनेकांकडून दुर्लक्ष केले जाते, कंटाळा केला जातो किंवा जाणून-बुजून मतदानाच्या अधिकाराला दुर्लक्षीत ठेवले जाते. परंतु मतदान हा आपला हक्क आहे आणि प्रत्येकाला आपल्या हक्काची जाणिव व्हावी व मतदान करून आपला हक्क बजवावा यासाठी सेवानिवृत्त कर्मचारी हरीदास गणबास हे सायकलवर फिरून मतदान जनजागृती करीत आहेत.

# उद्रेक होऊ देऊ नका, जास्त दिवस सहन करणार नाही:माझ्या आणि रोहितच्या आईवर बोलल्यास करारा जवाब मिलेगा;सुप्रिया सुळेंचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बारामती | प्रतिनिधी**

माझ्या आणि रोहितच्या आईवर दोनवेळा बोलला ठीक आहे, तिसऱ्या वेळी बोलला, तर करारा जवाब मिलेगा असा इशारा राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिला आहे. बारामतीमध्ये महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुप्रिया सुळे यांनी अनेक मुद्द्यांवर भाष्य करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही निशाणा साधला आहे.सुप्रिया सुळे यावेळी बोलतांना म्हणाल्या, ''आमच्या घरातील गोष्टी रोज टीव्हीवर दिसतात, अनेक प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे आहेत पण देणार नाही. अनेक महिने झालं सहन करत आहे, आता जास्त दिवस सहन करणार नाही, उद्रेक होऊ देऊ नका. माझ्या आणि रोहितच्या आईवर दोनवेळा बोलला ठीक आहे, तिसऱ्या वेळी बोलला, तर करारा जवाब मिलेगा'', असा रोखठोक इशारा सुप्रिया सुळेंनी दिला.याशिवाय सुप्रिया सुळेंनी अजित पवारांवरही निशाणा साधला



आहे. ''आमच्या खानदानाचे वाभाडे निघतील ते मी होऊ देणार नाही. नाती सांभाळायला शक्ती लागते तोडायला लागत नाही. प्रेमाने मागितले असते तर हसत हसत सर्व काही दिले असते. या जागेवर नेहमी आपली सांगता सभा होत असते. मात्र यावेळी सांगता सभेसाठी दुसऱ्यांनी बुकिंग केले आहे.त्या पुढे म्हणाल्या की, ''विरोधी पक्षात आल्यापासून जास्त टाळ्या आता मिळतात. माझा बाप थकला नाही श्रमलेला आहे. शरद पवार कृषी मंत्री असते तर कांदा, दूध दर मिळाला असता. शेतकरी कर्जमाफी झाली असती. २०१४ मध्ये आमची आई म्हणायची तुमचे सरकार येत नाही आणि खरंच सरकार नाही आले. आमच्या आईची आता कटकट वाढली आहे. आता ती म्हणते आता सरकार जाईल'', असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.दरम्यान, याच मेळाव्यात शरद पवारांचा ओरिजिनल डीएनए हा सुप्रियाताईंमध्येच आहे असे विधान सुनेत्रा पवारांच्या सख्ख्या जाऊबाई शर्मिला पवार यांनी केले आहे. मी पवारांची सून आहे, याचा मला अभिमान आहे. परंतु माझ्या नणंदेची जागा मी नाही घेणार असेही त्या म्हणाल्या. या विधानाचीही सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904